अपर पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग यांचे कार्यालय,
९१, सर पोचखानवाला रोड, वरळी, मुंबई – ४०००३०.
दुरध्वनी क्र. २४९२१२१२ (विस्ता),
Email- addlcpacbmumbai@mahapolice.gov.in
दिनांक :– २६.०४.२०२३

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# प्रेसनोट

| | |
|---|---|
| ला.प्र.वि. | बृहन्मुंबई विभाग. |
| गुन्हा नोंद क्रमांक व दाखल दिनांक | २०/२०२३ |
| कलम | कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ |
| आरोपी लोकसेवक | १) श्री. इंद्रजित गजाननराव देशमुख, वय ३७ वर्षे, पद - फिल्ड ऑफिसर (वर्ग-२)<br>२) श्री. संजय पोपटराव कावरे, वय ४३ वर्षे, पद - फिल्ड ऑफिसर (वर्ग-२)<br>कार्यालय - महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण कार्यालय, सायन, मुंबई. |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | रुपये १,००,०००/- |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | रुपये ८०,०००/- |
| हस्तगत लाचेची रक्कम | रुपये ८०,०००/- |
| थोडक्यात माहिती | यातील फिर्यादी हे मोटार वाहनांचे इंटरियर डिझायनिंग, पेंटींग इत्यादी काम करणाऱ्या कंपनीत एचआर मॅनेजर म्हणून काम करतात. दिनांक २३/०३/२०२३ रोजी वर नमुद दोन्ही आलोसे हे तक्रारदार यांच्या कंपनीत आले व कंपनीत वेस्ट वॉटर ट्रिटमेंट प्लांट नसल्याचे व वाहनांचे पेंटीग बाहेर करता या कारणास्तव आकारण्यात येणारा दंड खुप आहे शिवाय कंपनीचे पाणी व लाईट कनेक्शन बंद होईल अशी धमकी दिली व सदर कारवाई न करण्यासाठी रु. १,००,०००/- रोख स्वरुपात मागितले. त्यावेळी आलोसे यांना फिर्यादी यांनी रु. २०,०००/- रोख दिले. दिनांक २०/०४/२०२३ रोजी दोन्ही आलोसे पुन्हा फिर्यादी यांचे कंपनीत आले व त्यांनी उर्वरीत रक्कमेची मागणी केली. फिर्यादी यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे समक्ष हजर राहून लेखी तक्रार दिली.<br>फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून दिनांक २५/०४/२०२३ रोजी पंचासमक्ष केलेल्या पडताळणी दरम्यान आलोसे यांनी फिर्यादी यांना तात्काळ लाचेची रक्कम घेवुन येण्यास सांगितले. त्याप्रमाणे तात्काळ केलेल्या पडताळणी/सापळा कारवाईदरम्यान आलोसे यांनी रु. ८०,०००/- लाचेच्या रक्कमेची मागणी करुन ती स्विकारली म्हणून आलोसे क्र. १ व २ यांना ताब्यात घेवून त्यांच्याविरुध्द कलम ७ भ्र. प्र. अधिनियम १९८८ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. |

मार्गदर्शन अधिकारी :- श्री. विजय पाटील सो, अपर पोलीस आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभाग.

सहाय्यक पोलीस आयुक्त लाचलुचपत प्रतिबंधक विभाग बृहन्मुंबई सत्यमेव जयते

२६/४/२३
( संजय पाटील )
सहाय्यक पोलीस आयुक्त (प्रशासन),
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
मुंबई विभाग, मुंबई.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभागा तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारा संबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या आलोसेविरुद्ध तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभागाशी संपर्क साधावा.

संपर्क :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभाग, ९१, सरपोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई.
टोल फ्री क्र. १०६४, दूरध्वनी क्र. ०२२-२४९२१२१२, फॅक्स क्र. ०२२-२४९२२६१८
वेबसाईट :- acbmaharashtra.gov.in,
ईमेल :- addlcpacbmumbai@mahapolice.gov.in,
फेसबुक :- www.facebook.com - Maharashtra ACB
ईमेल :- acbwebmail@mahapolice.gov.in
मोबाईल ॲप :- www.acbmaharashtra.net